महाराष्ट्र शाहीर –

(केसरी २३ ऑगस्ट १९७८)

# प्रल्हादराय जामखेडकर एक गुणी कलावंत



पान २

भगवान श्रीरामचंद्रांच्या वास्तव्याने पावन झालेल्या नाशिक क्षेत्री, दिनांक ६ मे १८९१ रोजी, एका ब्राह्मण कुलात श्री. प्रल्हादराय रंगनाथ जामखेडकर यांचा जन्म झाला. त्यांचे शालेय शिक्षण तेथेच झाले. प्रल्हादराय यांना बालवयातच ऐतिहासिक वाङ्मयाची आवड उत्पन्न झाली व त्या आवडीतूनच त्यांना पोवाडे रचण्याची प्रेरणा मिळाली. मराठी आणि इंग्रजी शिक्षणाच्या संस्कारामुळे त्यांची भाषा व वाणी प्रज्वलित आणि ओजस्वी बनली. शिक्षणानंतर कांही काल त्यांनी पी. डब्ल्यू. डी. खात्यांत नोकरी केली. परंतु त्यांचे मन नोकरीत रमेनासे झाले. लवकरच त्यांनी आपल्या मानेवरील नोकरीचे जूं झुगारून दिले आणि १९२० सालापासून डफावर कणखर थाप मारून शाहिरी पेशा सुरू केला. थोड्याच दिवसांत त्यांनी स्वतःचा एक उत्कृष्ट व सुसज्ज असा शाहिरी संच उभा केला व स्वतः रचलेले पोवाडे नवनव्या चालींनी नटवून, सजवून, आपल्या खड्या व दमदार आवाजात गाऊन ते रसिक श्रोत्यांची मने आकर्षित करू लागले. मराठी सारस्वतात आपल्या लेखणीने आणि वाणीने महनीय कामगिरी करून मोठा नाव-लौकिक मिळविलेले जळगावचे शाहीर दुर्गाप्रसाद तिवारी यांनी शाहीर जामखेडकरांना उत्तेजन देऊन त्यांच्याशी चांगले सहकार्य केले व त्यामुळे त्यांचा उत्साह द्विगुणीत होत जाऊन त्यांच्या शाहिरी फडाचा पसारा प्रतिदिन शुक्लेंदुवत् वाढू लागला.

त्या सुमारास महाराष्ट्रात शाहिरी काव्य गायनाला बहर येऊ लागला होता. जे शाहीर स्वतः पोवाडे रचून स्वतःच ते गात अशांना फार मोठे उत्तेजन मिळून ते लोकप्रिय होऊ लागले. अशा प्रसिद्ध शाहिरांच गाजलेले पोवाडे कंठगत करून कांही जणांनी आपले शाहिरी फड उभे केले व गावोगांव दौरे काढून ते त्या नमन्या शिदोरीच्या जोरावर पोवाडेगायन करू लागले.

## शाहिरांची मालिका

" अनंत फंदी, रामजोशी, होनाजींनी।
कित्येक शाहिर हाती डफ घेऊनी।
चैतन्य दिले हो त्यांनी स्वराज्यातुनी।

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, उन्नती का अवनती पोवाडा, पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रपिता महात्मा गांधी, सुधारणा व देशस्थिति या पोवाड्यांचा समावेश आहे.

पोवाड्यां व्यतिरिक्त त्यांनी कांही लावण्या, 'असावा-नसावा', स्वरूपाची व इतर शाहिरी रंगाची कवने रचून त्यांचीहि शाहिरी पुष्पमाला गुंफून प्रसिद्ध केली.

## शैलीदार रचना

"शाहिरी-डफ नमन" – यांत गणपति, सरस्वती आदि देवदेवतांना नमन करून, त्यानंतर भारतातील महान संत, अनेक रथी-महारथी, शूर योद्धे, मुत्सद्दी, राजकारणपटु, बुद्धिमंत आणि वंदनीय महापुरुषांना वंदन केलेले आहे. हे नमन करतांना ते भूतकालांतील ज्येष्ठ व मान्यवर शाहिरांनाहि विसरले नाहीत. या थोर शाहिरांना वंदन करतांना ते म्हणतात.

आहारी जाऊन निर्बल झालेला समाज, स्त्रीसुलभ लज्जा व विनय कमी होत चाललेल्या कुलीन स्त्रिया, देशभक्तांच्या नांवावर फंडगुंडगिरी करणारा तथाकथित देशभक्त पुढाऱ्यांचा वर्ग, या सर्वांवर त्यांनी ताशेरे झाडून त्यांचा निषेध केला आहे.

जामखेडकरांच्या तरुण वयांत निषेधार्ह वाटणाच्या अशा प्रकारच्या किती तरी गोष्टी हल्लीच्या समाजांत इतक्या रूढ व नित्य परिचयाच्या झाल्या आहेत की, त्यांची ही टीका आता अस्थानी वाटण्यासारखी आहे.

जगन्नाथपुरीचे जगद्गुरु श्रीमत् शंकराचार्य यांनी जामखेडकरांना १९४५ साली 'कविभूषण' ही गौरवपूर्ण पदवी अर्पण करून त्यांना सन्मानित केले आहे. महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर व स्वा. वीर सावरकर यांच्यावरील त्यांचे पोवाडे अविस्मरणीय असे आहेत. यंग इंडिया ग्रामोफोन कंपनीने त्यांच्या 'रेशनिंग' या विषयावरील पोवाड्यांच्या दोन ध्वनिमुद्रिका काढल्या असून त्या एकेकाळी कलादृष्टींनी वरचे आहे. पोवाडे लिहून व गाऊन त्यांनी नांव कमाविले आहे. त्यांच्या काव्यात विद्वत्तेचे तेज आहे, पण तेच कांही ठिकाणी पोवाड्याच्या अस्सलपणाला मारक होते. पोवाड्याची अस्सल जडणघडण त्यांच्यापाशी नाही. ती शाहीर नानिवडेकरांमध्ये आढळते. पांडित्याचा परिपोष किंबहुना नवरसांचा परिपोष त्यांच्या कवनांत नाही. कवनाचा मध्य बिंदु हुडकून त्यावर सारा भर देणे फारच थोड्या शाहिरांत आढळले. खानदेशांतील शाहीर प्रल्हादराय जामखेडकर यांचे पोवाडे अलंकारपूर्ण असूनहि सुबोध आहेत." या अभिप्रायांत शाहीर जामखेडकर यांचा फार मोठा गौरव झाला आहे.

## वीर रसाचा उठाव

कोणत्याहि ऐतिहासिक विषयावर पोवाडा लिहितांना जामखेडकर आधी त्या विषयाची उपलब्ध असलेली सगळी माहिती मिळवितात व त्या आधारे आपल्या पोवाड्यांची रचना करतात. त्यामुळे त्यांचे पोवाडे ऐतिहासिक माहितीच्या चौकटीत कोणता कथा भाग अगर प्रसंग वर्णिलेला आहे. त्याची क्रमवार माहिती ते आधी देतात व मग पोवाडा सुरू होतो. त्यामुळे पोवाड्याचे कथानक वाचकांना समजणे अधिक सुलभ झाले आहे. इतर शाहिरांनी आपले पोवाडे छापतांना जामखेडकरांचे या बाबतीत अनुकरण करून पहाण्यासारखे आहे.

जामखेडकरांची बरीच शाहिरी कवने पुस्तिकारूपाने प्रसिद्ध झाली असली तरी त्यांची किती तरी शाहिरी कवने हस्तलिखित स्वरूपांत अप्रकाशित राहिलेली आहेत.

हल्लीच्या काळांत या पोवाडेकार शाहिरांना फारशी अर्थप्राप्ति होत नसल्याने ते मागे पडू लागले आहेत. आपले कल्याणकारी सरकार तमाशा कलेला उत्तेजन देत असते. तमाशा महोत्सव आयोजित करून त्यांतील कलावंतांना सरकार अल्प कां होईना, मानधन देत असते. तथापि पोवाडेकार शाहिरांना सरकारचा अशा प्रकारचा आश्रय मिळत नाही. महाराष्ट्र सरकारने पोवाडे गायन स्पर्धा अगर महोत्सव आयोजित करून पोवाडेकार शाहिरांना उत्तेजन कां देऊ नये? त्यांना सरकार विचारीत नाही व जनताहि त्यांची बूज ठेवीत नाही. त्यामुळे हे वाङ्मय खुरटू लागले आहे व ही कला मागे पडत चालली आहे.

शिवाजीमहाराजांच्या काळांत शाहीर अज्ञानदासाने अफझलखान वधाचा पोवाडा रचून गायल्याबद्दल त्याला शेरभर सोन्याचा तोडा व एक घोडा बक्षीस मिळाला. तथापि आता तो काळ राहिला नाही. शाहीर जामखेडकरांनीहि अफझलखानाच्या वधाचा एक उत्कृष्ट पोवाडा रचला आहे. पण त्याबद्दल त्यांना बक्षीस कोण देणार? याच पोवाड्याच्या शेवटी जामखेडकर यांनी मोठ्या आवेगाने पुढील उद्गार काढले आहेत ते ध्यानांत घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात :—

"शाहिराने करता पोवाडा।
सोन्याचा तोडा।
आणि एक घोडा।
[illegible]।

पान २

# एक गुणी कलावंत



होता. जे शाहीर स्वतः पोवाडे रचून स्वतःच ते गात असताना फार मोठे उत्तेजन मिळून ते लोकप्रिय होऊ लागले. अशा प्रसिद्ध शाहिरांचे गाजलेले पोवाडे कंठगत करून काही जणांनी आपले शाहिरी फड उभे केले व गावोगाव दौरे काढून ते त्या नमुन्या शिदोरीच्या जोरावर पोवाडेगायन करू लागले.

## शाहिरांची मालिका

शाहीर खाडिलकर व नानिवडेकर, मुचाटे, दीक्षित, जामखेडकर, मुळे इत्यादि काही शाहिरांचा असा अलिखित नियम होता की प्रत्येक वर्षी गणेशोत्सव व इतर प्रसंगी नवीन रचून नव्या ढंगात ते जनतेपुढे सादर करावयाचे. त्यामुळे शाहिरी क्षेत्रात असे मोजकेच शाहीर प्रस्थापित झाले व त्यांना मोठे लौकिक प्राप्त झाला. या शाहिरांनी केवळ जुन्या चालीवरच भर न देता, पोवाड्यातील प्रसंगानुरूप नव्या नव्या चाली योजून आपले पोवाडे अधिक आकर्षक केले.

जामखेडकरांनी विपुल पोवाडे रचना केली आहे. त्यांच्या पोवाड्यांच्या पंचवीस-तीस पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत. गाजलेल्या अनेक पोवाड्यांच्या पुस्तिकांच्या कित्येक आवृत्त्या त्यांना काढाव्या लागल्या आहेत. त्यांनी आपल्या पोवाड्यांची शाहिरी पुष्पमाला गुंफून प्रसिद्ध केली आहे. या पुष्पमालेतील वीररत्न मुरारबाजी, प्रतापी प्रतापसिंह, सिंहगडचा संग्राम, वीरास सव्वाशेर अर्थात अफझलखान वध, संग्राम देवता राणी लक्ष्मीबाई, पुण्यस्मरण (राणी लक्ष्मीबाईवर दुसरा पोवाडा), जवानमर्द, शामभाई बापू गोखले, आधुनिक भीष्म अर्थात् बाजी प्रभू देशपांडे, बदामीचा वेढा, पं. मोतीलाल नेहरू, रंगाचा पोवाडा,

" अनंत फंदी, रामजोशी, होनाजींनी।
कित्येक शाहिर हाती डफ घेऊनी।
चैतन्य दिले हो त्यांनी स्वराज्यातुनी।
गजबजला अवघा महाराष्ट्र
शूरमर्दांनी।
महाराष्ट्र देवता प्रसन्न झाली क्षणी।
मर्द वीर लोपता पारतंत्र्य ये क्षणी ।।"

जामखेडकरांच्या 'आधुनिक भीष्म अर्थात् बाजी प्रभु देशपांडे' या पोवाड्यातील पुढील पंक्ती काव्यदृष्ट्या लक्षात घेण्यासारख्या आहेत. "फाजलखान सिद्दी जोहार। शहाचा हार! खाईना हार। रणावरी खाईना जो हार। विजयश्री घाली सदोदित हार। पण शिवापुढं खाल्ली त्यानं हार। हार खाऊन झाला परिहार। झाला जोहार। अल्ला पालन हार दिल्लीत काऽऽहार ।। ध्रु "।। यात 'हार' या शब्दाचे अनेक अर्थ आणून अन्त्य यमकहि साधले आहे.

जामखेडकरांनी सामाजिक विषयांवरहि आपली लेखणी चालविली आहे. त्यांचा 'सुधारणा' व 'देशस्थिति' ही शाहिरी कवने उल्लेखनीय वाटतात. इ. स. १९३१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'सुधारणा' या कवनात त्यांनी त्या वेळच्या समाजस्थितीचे वर्णन करून सर्वत्र कसा अनाचार माजून अधःपात झाला आहे हे दाखविले आहे. त्यात स्नान संध्या न करणारा ब्राह्मण समाज, अंगी मर्दपणा नसलेले क्षत्रीय स्वहस्ते नित्य दाढी घोटणारा व आईबाप जिवंत असतांना मिशा काढणारा तरुण वर्ग, दूध तूप लोपून चहाच्या

कंपनीने त्यांच्या 'रेशनिंग' या विषयावरील पोवाड्याच्या दोन ध्वनिमुद्रिका काढल्या असून त्या एकेकाळी कमालीच्या लोकप्रिय झाल्या होत्या. जामखेडकरांचा झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्यावरील पोवाडा बराच गाजला होता. त्यांनी तो पोवाडा झांशीच्या राणीच्या वंशजांनाहि ऐकविला असून त्यांच्याकडून शाबासकी मिळविली आहे.

## पोवाड्यांचा गौरव

त्यांच्या कित्येक पोवाड्यांना साहित्यसम्राट न. चि. केळकर, दुर्गाप्रसाद तिवारी, नाथ निफाडकर, के. म. सोनाळकर, शाहीर पां. द. खाडिलकर, य. न. केळकर, संत कवि दासगणु महाराज, गोविंद गोपाळ देसाई, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, द. वा. जोशी (संपादक 'प्रागतिक') इत्यादि थोरांचे आशीर्वाद व प्रस्तावना लाभल्या असून, त्या सर्वांनी त्यांचे पोवाडे वाखाणले आहेत. ज्ञानप्रकाश, केसरी, महाराष्ट्र (नागपूर), लोकसत्ता (नाशिक), चित्रमयजगत्, प्रागतिक (जळगाव), प्रबोध (धुळे) इत्यादि नियतकालिकांनी त्यांच्या पोवाड्यांचा गुणगौरव केलेला आहे.

पुण्याच्या 'केसरी' या पत्राने सन १९२४ मधील एका अंकातून "शाहिरी वाङ्मय खुरटू देऊ नका" या शीर्षकाचा लेख प्रसिद्ध केलेला आहे. त्या लेखांत असे म्हटले आहे की, "शाहीर खाडिलकर यांचे शाहिरी वाङ्मयातील स्थान संख्या व गुण या दोन्ही

माहिती मिळवितात व त्या आधारे आपल्या पोवाड्यांची रचना करतात. त्यामुळे त्यांचे पोवाडे ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने सत्याला धरून उतरले आहेत.

त्यांच्या बाजी प्रभू देशपांडे, मुरारबाजी व सिंहगडच्या पोवाड्यात वीररसाला उधाण आलेले दिसते. वीररसाचा उठाव करतांना सुयोग्य शब्दांची निवड ते चांगल्यारीतीने करतात व त्यामुळे आवेशपूर्ण रचना करण्यांत त्यांना फार मोठे यश लाभले आहे.

झांशीच्या राणीच्या पोवाड्यांतील त्यांच्या भाषेचा आवेश उल्लेखनीय असा आहे. झांशीच्या राणीची शोकांतिका त्यांनी इतक्या आत्मियतेने व सहृदयतेने रेखाटली आहे की, पोवाड्याचा तो भाग वाचतांना रसिक वाचकाला गहिवरून आल्याशिवाय राहणार नाही. तो सर्वच पोवाडा विषयाला अनुरूप अशा भाषेत त्यांनी लिहिला असल्यामुळे अत्यंत वाचनीय झालेला आहे.

आधुनिक क्रांतिकारकांच्या कार्याचे मूल्यमापन करणारा या दृष्टीने त्यांचा स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पोवाडा उत्कृष्ट आहे. सावरकरांच्या काळातील राजकीय व सामाजिक चळवळीचे यथार्थ दर्शन या पोवाड्यातून होते.

जामखेडकरांच्या छापलेल्या पोवाड्यांच्या पुस्तिकांचे एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे. पोवाडा सुरू करण्यापूर्वी त्या पोवाड्यातील प्रत्येक

[illegible] आहे. [illegible] त्यांना बक्षीस कोण देणार ? याच पोवाड्याच्या शेवटी जामखेडकर यांनी मोठ्या आवेगाने पुढील उद्गार काढले आहेत ते ध्यानांत घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात :—

"शाहिराने करता पोवाडा।
सोन्याचा तोडा।
आणि एक घोडा।
राजाने बक्षिस दिधला त्यास।
धन्य दाता शिवाजी झाला।
आज कोण बोला।
देतो हो मला।
अशा बक्षिसास ? ।। जी जी ।।
दारिद्र्यात पंख रुतले।
हाल हाल झाले।
बेकार वाढले।
कोण देणार आज तोडा ?।
फार झाले तर हातापायाला।
घाला आता खोडा।
पुष्प हे जोडा ।। जी जी ।।"

शाहीर प्रल्हादराय जामखेडकर आता फार उतार वयाचे झाले आहेत. त्यांचे वय ८७ वर्षांचे झाले आहे. त्यांना आता तोड्याची अगर इतर कोणतीहि अपेक्षा उरली नाही. ते अतिशय समाधानी व आनंदी आहेत. कृतार्थ जीवन उपभोगल्याचा आनंद त्यांना लाभला आहे.

अधांतरी

'कॉवर्ड ऑफ शॅडोज' या मनोहर माळगावकर यांच्या ग्रंथात कादंबरीचा भा. द. खेर यांनी केलेला रसाळ अनुवाद.

कि. रु. १५ ट. ख. रु. २-५०

केसरी प्रकाशन

५६८ नारायण पेठ, पुणे ३०

केसरी, १३ ऑगस्ट १९७८